विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचा समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंटच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इंटरनॅशनल एक्सपोझर व्हिजीट प्रोग्रामचा समारोप झाला. यामध्ये सहकार क्षेत्रातील यशस्वी उद्योग प्रारूपांना भेटी देण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी विविध देशातील सहभागी मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी जिल्हा मध्यवर्ती बँक, श्रीराम सहकारी बहुउद्देशीय संस्था, दत्त सहकारी साखर कारखाना, वारणा सहकारी बझार व गोकुळ दुध उत्पादक संघाचा समावेश आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सहकारी तत्वावर कशा प्रकारे सर्वसमावेशक विकास साध्य करण्यात आला याचा अभ्यास करण्यासाठी देशातील विविध राज्यातुन, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, आंध्रप्रदेश, कर्नाटक तर परदेशातुनही नेपाळ, बांग्लादेश येथील सहकार क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत असणारे अधिकारी व शिक्षक सहभागी झाले होते. या सर्वांच्या निरिक्षणातून एकच गोष्ट अधोरेखीत झाली ती कोल्हापूर जिल्हा हा देशासाठीच नव्हे तर जगासाठी सहकार क्षेत्रातील एक आदर्श प्रारूप आहे. प्रास्ताविक डॉ. निलम खामकर व चेतन गळगे यांनी केले. समालोचन डॉ. डी. रवी यांनी केले. आभार डॉ. संतोष सुतार यांनी मानले.

ज्येष्ठ नागरिकांच्या आनंदासाठी विद्यापीठ

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील : विद्यापीठाच्या वतीने आनंददायी जीवनवर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठ परीक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या आनंदी जीवनासाठी विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशील राहील. विद्यापीठ ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करत असून कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने घेतलेली ही कार्यशाळा स्तुत्य उपक्रम आहे, असे मत प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी खेळातून आनंददायी जीवन या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. याप्रसंगी ते बोलत होते.

प्र-कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले, जेष्ठ नागरिकांचे वय लक्षात घेता त्यांच्या शारीरिक सदृढतेबरोबर मानसिक सदृढता महत्वाची आहे. प्रत्येकाने आयुष्यात एक ठराविक वय झाल्यानंतरही न थांबता ज्ञानावर्ती काम करत राहीले पाहीजे.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ नागरिकांच्या कार्यशाळेतील चर्चेप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. ए. गुरव, व ज्येष्ठ नागरिक.

कार्यशाळेत डॉ. कृष्णा पाटील प्रा. ए. एम. गुरव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्राध्यापक,अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

09 FEB 2021

गल्लोगल्ली दिवटा अन् गीतांचे सादरीकरण

दिवाळीचे स्वागत : सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात पश्चिम भागात लोककला टिकून

» जागर लोककलांचा - भाग २

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : दिवटा म्हणजे गल्लीच्या अस्मितेचा प्रश्न, आपल्या गल्लीत दुसऱ्या गल्लीचा दिवटा येणार नाही, याची दक्षता घेतली जाते. दिवाळीच्या आठ दिवस अगोदर दारोदार दिवटा ओवाळण्याची प्रथा आहे. ती महाराष्ट्रभर पाहावयास मिळत असली तरी सांगली व कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागातील तिची परंपरा वेगळी आहे. दिवटा ओवाळत निरनिराळ्या गीतांचे सादरीकरण करणे, हा त्यातील महत्त्वाचा गाभा.

दिवाळीचे स्वागत करण्यासाठी ही प्रथा सुरू झाली असावी, असे सांगितले जाते. ही प्रथा कालांतराने सर्व जातीत रूढ झाली. गल्लोगल्ली दिवटा घेऊन मुले सायंकाळच्या वेळी दिवट्यांच्या गीतांचे सादरीकरण करतात. गल्लीतील दारोदार जाऊन दिवटा ओवाळतात. त्यासाठी ते वेगळी वेशभूषा किंवा रंगभूषा करत नाहीत. बडबडगीतांत मोडणारी गीते सादर झाल्यानंतर मुलांना दिवट्यासाठी तेल व खोबरे दिले जाते. ही गीते परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत आली आहेत. काही गावांत मुलांकडूनच गीते तयार झाली आहेत. गाव, परिसर, देशपातळीवरील घटना किंवा व्यक्तींचे संदर्भ गीतांत येतात. एका गल्लीतील दिवटा दुसऱ्या गल्लीत घेऊन जायचा नाही व दुसऱ्या गर्दीतील दिवटा आपल्या गल्लीत येऊ द्यायचा नाही, असा संकेत पाळला जातो.

दिवाळीतील पाडव्याचा दिवस हा दिवटा ओवाळणीचा शेवटचा दिवस असतो. वेळूच्या गवतापासून नागाची प्रतिमा याच दिवशी आकार घेते. महिला यादिवशी नागाच्या फडीला ओवाळतात. दिवटा ओवाळण्याची प्रथा आजही काही गावात टिकून असली तरी तिचे प्रमाण हळूहळू कमी होत आहे.

कोल्हापूर : दिवटा ओवाळणी करताना मुले.

दिवटा ओवाळण्याची प्रथा नेमकी कधी सुरू झाली, याबाबत नेमकेपणाने सांगणे कठीण आहे. कालानुरूप या परंपरेत बदल होत गेले. दिवाळीची शोभा वाढवणे व मनोरंजन करणे, हा मुख्य उद्देश आहे. आज ज्येष्ठ नागरिक ही लोककला टिकविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. तिचे हस्तांतरण ते नव्या पिढीकडे करत आहेत. मात्र, सोशल मीडियाच्यात अडकलेली पिढी ही लोककला येईल का, याबाबत साशंकता आहे.

- प्रा. डॉ. नंदकुमार मोरे.

तळसंदे : येथील डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. रणधीर शिंदे. शेजारी डॉ. एस. आर. पावसकर, जे. ए. खोत, तेजस्विनी आडनाईक.

तळसंदे डीवायपी कॅम्पसमध्ये व्याख्यान

कोल्हापूर : तळसंदे (ता. हातकणंगले) येथील डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त व्याख्यानाचे आयोजन झाले. शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी 'मातृभाषा, वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर संवाद साधला. मराठी भाषेची सद्यस्थिती, एकूणच वाचनाचा संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध पैलू असा वेध घेत त्यांनी या विषयावर सर्वांगीण भाष्य केले. कॅम्पसचे संचालक डॉ. एस. आर. पावसकर यांनी स्वागत केले. जे. ए. खोत, आर. एस. पवार आदी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक तेजस्विनी आडनाईक यांनी संयोजन केले.

09 FEB 2021

मेंढीचे दूध कॅन्सरवर उपयोगी

डॉ. पाटील यांचे संशोधन; सूक्ष्म जीवाणू करतात प्रतिकार

» आम्ही कोल्हापुरी

नंदिनी नरेवाडी - पाटोळे :
सकाळ वृत्तसेवा

डॉ. पाटील

कोल्हापूर, ता. ८ : मेंढीचे दूध नियमित प्यायल्याने कर्करोग होत नाही, या दुधापासून बनविलेली भुकटीही कर्करोगाला दूर ठेवू शकते, असे संशोधन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठात डॉ. अभिनंदन पाटील यांनी केले आहे. त्यांच्या या संशोधनाची अमेरिकेतील 'एनसीबीआय' या संस्थेने दखल घेतली आहे. या दुधातील कर्करोगास प्रतिकार करणाऱ्या सत्वहीन प्रथिने निर्माण करणाऱ्या सूक्ष्म जीवाणूचा त्यांनी शोध लावला आहे. या दुधातील सूक्ष्म जीवाणूंपासून तयार केलेल्या भुकटीपासून कर्करोगावर परिणामकारक ठरणारी औषधे बाजारात येणार आहेत.

या दुधातील सूक्ष्म जीवाणू आतड्यांचे ट्युमर नष्ट होण्यास मदत करतात. शिवाय भविष्यात आतड्याचा कर्करोग होण्याची शक्यता संपते, असे संशोधनात पुढे आले. याचा पहिला प्रयोग उंदरांवर केला जो यशस्वी झाला. त्यानंतर त्यांनी दुधातील सूक्ष्म जीवाणूंपासून तयार केलेल्या औषधांमुळे कर्करोगावर उपचारही होऊ शकतात, असे निष्कर्ष मांडले. या संशोधनासाठी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शिवाजी पवार, डॉ. जॉन डिसूजा, डॉ. सी. डी. लोखंडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

डॉ. अभिनंदन कोल्हापूरचे. भारती विद्यापीठातून त्यांनी बी. फार्मचे शिक्षण घेतले. वारणानगर येथून एम.फार्म पूर्ण केले. त्यानंतर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठात पी.एचडी.चे संशोधन सुरू केले. तेथे त्यांनी नॅनो फॉरमोकॉलॉजी म्हणजेच सूक्ष्म जीवाणूंवर पाच वर्षे संशोधन केले. सध्या ते संजय घोडावत विद्यापीठात स्कूल ऑफ फार्मसीमध्ये कार्यरत असून मेंढीच्या दुधातील सूक्ष्म जीवाणूंपासून कर्करोगावरील उपचार पद्धती या विषयावर तेथे संशोधन सुरू आहे. कर्करोगाचे प्राथमिक अवस्थेतील निदान या विषयावर त्यांनी जपान मधील टोकियो विद्यापीठात शोधप्रबंध सादर केला होता. त्यांच्या या शोधनिबंधातील संशोधनाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. तसेच फार्मसी विभागातील आदर्श विद्यार्थी म्हणूनही त्यांना माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्याकडून राष्ट्रपती पुरस्काराने गौरविले होते.

आदमापुरातील मेंढ्यांच्या दुधात जिवाणू

विशेष म्हणजे, कर्करोगावर जालीम इलाज करणारे हे दूध केवळ आदमापूर परिसरातील मेंढ्यांमध्येच आढळते, असे संशोधनात स्पष्ट झाले आहे. डॉ. पाटील यांनी २०१६ - १७ साली आदमापूर परिसरातील मेंढ्यांच्या दुधाचा अभ्यास सुरू केला. दुधाचे सॅम्पल घेऊन त्यातील सूक्ष्म जीवाणूंचे जनुकीय पद्धतीने संशोधन केले. तसेच हे दूध नेहमी पिणाऱ्या व्यक्तींचाही अभ्यास सातत्याने सुरू ठेवला.

09 FEB 2021

पूरक उद्योग, हमीभाव हेच उत्तर!

डॉ. लळुले

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. ज्ञानदेव लळुले यांनी विदर्भ, मराठवाड्यातील 'शेतकरी आत्महत्या' या विषयाचा सखोल अभ्यास केला आहे. त्याविषयी त्यांच्याशी केलेली चर्चा.

ओंकार धर्माधिकारी

यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यातील ११०५ गावांतील १५१९शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे लळुले सरांनी सर्वेक्षण केले. याशिवाय औरंगाबाद, नागपूर, अमरावती या तीन विभागातील सन२००१-२०१८ या कालावधीतल्या शेतकरी आत्महत्यांचाही अभ्यास केला. त्यांचा शोधनिबंधही प्रसिद्ध झाला आहे.

- **प्रश्न : शेतकरी आत्महत्यांना कशामुळे सुरुवात झाली?**
- प्रा. लळुले : देशात एकोणीसाव्या शतकापासून शेतकरी आत्महत्या होत आहेत. ब्रिटिशांनी जमीनदारी पद्धत आणली, त्यातून शेतकऱ्यांचे शोषण वाढले. सावकारी कर्ज घेणे सुरू झाले. ते फेडणे अशक्य झाल्याने अनेकांनी मृत्यूला कवटाळले. १८५०ते १९४०या कालावधीत तमिळनाडू, बंगाल, कर्नाटक राज्यांत शेतकरी आत्महत्यांची नोंद आहे. स्वातंत्र्यानंतरही त्यांचे सत्र सुरूच राहिले. महाराष्ट्रात १९मार्च १९८६रोजी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबातील सहा जणांनी आर्थिक विवंचनेतून विष पिऊन आत्महत्या केली, राज्यात खळबळ उडाली. त्यानंतर पंजाब, केरळ, आंध्र प्रदेश (आताचा तेलंगणा), महाराष्ट्र, कर्नाटकात आत्महत्यांचे प्रमाण अधिक राहिले. विशेष म्हणजे कापूस, रबर, तूर, सोयाबीन, गहू अशी नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. २००१-२०१८ या कालावधीत देशात २ लाख ३५ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यातील २३ हजार ७०१ शेतकरी विदर्भ व मराठवाड्यातील १८ जिल्ह्यांतील होते.

- **विदर्भ, मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्येचे नेमके कारण काय?**
- येथील शेतकरी जेव्हा दीर्घकाळ शेतमाल विकत राहतो तेव्हा त्याची शेती आतबट्ट्याचीच ठरते. दीर्घकाळाचा विचार करता, शेतकरी कापूस खुल्या बाजारात विकतो तेव्हा त्याला एकरी ४,७७५ रुपये, तुरीमागे ४,५१३, करडईमागे २८६६ रुपयांचा तोटा होतो. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माल विकला आणि तेथे किमान हमी भाव मिळाला तरच तोटा कमी होतो. शेती उत्पन्न बाजार समित्यांत किमान हमी भाव मिळत नाही. किमान हमी भाव न देणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे. पण असे गुन्हेच दाखल होत नाहीत. रोजगाराची पर्यायी साधने नसल्याने शेतकरी शेतीवरच अवलंबून राहतो. सातत्याने तोट्यामुळे शेतकऱ्यांना शेती व इतर कौटुंबिक कारणांसाठी सावकारी कर्ज घ्यावे लागते. विदर्भात एकूण कर्जांपैकी ५६टक्के सावकारी, तर ४६टक्के कर्ज संस्थात्मक आहे. आत्महत्याग्रस्त प्रतीशेतकरी कुटुंब कर्ज हे १लाख ११हजार १२७रुपये आहे. उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. कर्ज फिटणार नाही हे लक्षात आल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतात. बहुतांश कर्ज हे शेती, आरोग्य आणि इतर कारणांसाठी घेतले जाते. सरकारी दवाखाने सक्षम नसल्याने नाईलाजाने खासगी दवाखान्यात कर्ज काढून उपचार घ्यावे लागतात.

पात्र-अपात्रतेचा खेळ

आर्थिक कारणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना १ लाख रुपये नुकसानभरपाई मिळते. त्यासाठी, त्या शेतकऱ्याच्या नावे सातबारा लागतो. भरपाई देताना सरकारी अधिकारी पात्र, अपात्रतेचा खेळ करतात. बहुतांश महिलांच्या नावे सातबारा नसतो. त्यामुळे जर महिला शेतकऱ्याने आत्महत्या केल्यास त्यांच्या वारसांना भरपाई मिळत नाही. आत्महत्येचा वाढता आकडा लपवण्यासाठी हा घोळ केला जातो.

- **शेतीत सातत्याने तोटा का होतो?**
- विदर्भ, मराठवाड्यातील शेतीमधील उत्पादन खर्च वाढत आहे. त्या तुलनेत शेतमालाला भाव नाही. उदा. शेतकऱ्याकडून ४४५०रुपये क्विंटलने कापूस खरेदी केला जातो. मात्र केवळ त्यातील सरकी बाजूला केल्यानंतर स्वच्छ कापसाची किंमत २६हजार रुपये प्रतिक्विंटल होते. याशिवाय सरकीपासून बनविलेल्या उपपदार्थांचे पैसेही व्यापाऱ्यांना मिळतात. त्या तुलनेत शेतकऱ्याच्या हाती काहीच उरत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, विदर्भात सूतगिरण्या अत्यल्प आहेत. विदर्भात पाऊस भरपूर पडतो; मात्र सिंचन क्षेत्र केवळ १४.०८टक्के, तर मराठवाड्यात १२.८०टक्के आहे. हमी भाव नसणे, उत्पादन खर्च अधिक, विस्कळीत पतपुरवठा, बिगरशेती रोजगाराचा अभाव ही शेतकरी आत्महत्येची मूळ कारणे आहेत; मात्र राजकीय अनास्था, प्रशासकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि अकार्यक्षमता हे मागासलेपणाचे मूळ आहे.

- **आत्महत्या थांबवण्यासाठी उपाय काय?**
- विदर्भ, मराठवाड्याचा विकासाचा अनुशेष दूर करावा. सद्यस्थितीत तेथील सिंचन क्षमता वाढवणे, औद्योगिकरणातून बिगरशेती रोजगार उपलब्ध करणे, सहकार चळवळ सक्षम करून सहकारी बँकांद्वारे अल्प व्याजाने शाश्वत पतपुरवठा, कृषी प्रक्रिया उद्योगांची उभारणीद्वारे शेतीमालाला हमी भाव मिळावा यासाठी प्रयत्न अशा उपाययोजनांतून तेथील शेती नफ्यात आणता येईल. तरच आत्महत्या घटतील.

पुढारी EDUदिशा

फूड टेक्नॉलॉजी

आधुनिक काळातील एक उत्तम करिअर संधी

डॉ. ए. के. साहू

अन्न हे मनुष्याच्या मूलभूत गरजापैकी एक आहे. काळानुसार माणसांच्या जेवणाच्या सोयी बदलल्या गेल्या आहेत. त्यामुळे प्रक्रिया केलेल्या अन्नाचा नवीन पर्याय आला आहे. सध्या बाजारात प्रीप्रीसेस्ड व प्रोसेस्ड पदार्थांची चांगली चलती आहे. असे खावेसे वाटणारे पदार्थ अगदी कमी वेळात बनवता येतात. त्यामुळे यांना प्राधान्य दिले जाते आणि बाजारात यांची मागणीही खूप आहे. पण, हे पदार्थ बनवण्यामागचे एक तंत्र आहे. त्या तंत्राला फूड टेक्नॉलॉजी म्हणजेच 'अन्न तंत्रज्ञान' असे म्हणतात. प्रक्रियावर आधारित खाद्यपदार्थांवर आपला अवलंब वाढत असल्याने अन्न तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अनेक संधी निर्माण होत आहेत.

आजच्या आधुनिक काळात नोकरी करणाऱ्या महिलांना नोकरी व घरातले काम अशा दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात. त्यामुळे स्वयंपाकासाठी मिळणारा वेळ कमी होत चालला आहे. पर्यायी रेडी टू इट, रेडी टू कूक, रेडी टू सर्व्ह पदार्थांनी त्यांचे काम खरोखरंच सुखकर बनवले आहे. अशाच उपयुक्त अन्नपदार्थाची निर्मिती करणारं शास्त्र म्हणजे फूड टेक्नॉलॉजी! या शास्त्रात पारंगत असणाऱ्या व्यक्तीला 'फूड टेक्नॉलॉजिस्ट' असे म्हणतात.

नाशवंत अन्नपदार्थ जास्त काळ टिकावेत यादृष्टीने त्यावर प्रक्रिया करणे, पण हे करताना अन्नपदार्थामधली पोषक मूलद्रव्ये, गुणवत्ता, रंग-रूप यांचेही जतन करणे ही तारेवरची कसरत कुशलतेने पार पडणाऱ्या फूट टेक्नोलॉजिस्टचं व्यावसायिक क्षेत्र आज खूपच विस्तारलेले आहे. एवढेच नाही तर विविध खाद्यपदार्थांची निर्मिती, त्यांची साठवणूक, त्यांचे पॅकेजिंग आणि त्यांचे वितरण अशी अनेक कामे त्यांना करावी लागतात.

उत्पादनाचे विकास, त्यांचे गुणवत्ता नियंत्रण आणि संशोधन हे या क्षेत्रातील इतर महत्त्वाची कामे आहेत. लहान मुले, किशोरवयीन मुले, तरुण, वयोवृद्ध माणसे, गरोदर स्त्रिया आणि क्रीडापटू यांचा विचार करून विविध घटकांचा वापर करून त्यांच्या गरजेनुसार प्रथिनेयुक्त, खनिजेयुक्त, अतिरिक्त ऊर्जायुक्त नवनवीन पूरक पदार्थ कसे बनवायचे यावर संशोधन करूनच पदार्थ बनवण्याचे काम फूड टेक्नॉलॉजिस्ट करतात. परंतु, हे सर्व करताना पदार्थांची मूलभूत गुणवत्ता चांगली राखणे एका कसोटीचे काम असते.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारत जगातील सर्वांत मोठे दूध, कडधान्य आणि जूट उत्पादन करणारा देश आहे. तांदूळ, गहू, ऊस, शेंगदाणे, भाज्या, फळे आणि कापूस उत्पादनात देशाचा दुसरा क्रमांक आहे. तसेच मसाले, मासे, कुक्कुटपालन, पशुधन आणि वृक्षारोपण पिकाच्या उत्पादनात भारत देश अग्रणी आहे. अन्न प्रक्रिया उद्योग हे भारतातील

एक सनराईज क्षेत्र आहे ज्याने अलीकडच्या वर्षात खूपच महत्त्व प्राप्त केले आहे. हे अर्थव्यवस्थेतील कृषी आणि औद्योगिक क्षेत्रामध्ये एका दुव्याचे काम निभावते. त्यामुळे फक्त शहरातच नाही, तर ग्रामीण भागातही फूड टेक्नॉलॉजी हे महत्त्वाचं क्षेत्र बनत चालले आहे. शेतात तयार होणाऱ्या भाज्या, फळे व अन्नधान्य इत्यादींवर योग्य ती प्रक्रिया करून त्यांचे आर्थिक मूल्य वाढवणे हे फूड टेक्नॉलॉजीनेच शक्य झाले आहे.

कृषिमालावर प्रक्रिया करणारा उद्योग हा भविष्यात झपाट्याने वाढणारा आणि जास्तीत जास्त रोजगार निर्माण करणारा असेल, असे म्हटले जाते. लोकसंख्येचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन फूड टेक्नॉलॉजिस्ट यांची गरज व महत्त्व वाढू लागले आहे. विशेष म्हणजे मंदीचा व कोव्हिड-१९ चा परिणाम अनेक उद्योगांवर झालेला असला तरी फूड इंडस्ट्रीजवर त्याचा परिणाम झाला नाही. साहजिकच फूड टेक्नॉलॉजी हा करिअरचा चांगला पर्याय ठरू शकतो.

विद्यापीठ कर्मचारी संघ, महावितरण विजयी

» टी २० 'क' गट क्रिकेट स्पर्धा

कोल्हापूर, ता. ८ : राजाराम कॉलेजच्या मैदानावर जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे टी २० 'क' गट क्रिकेट स्पर्धेतील आजचा पहिला सामना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघविरुद्ध संजीवन इंजनिअरींग कॉलेज, पन्हाळा यांच्यात झाला. यात विद्यापीठ कर्मचारी संघाने १५ धावांनी विजय मिळविला.

प्रथम फलदांजी करताना विद्यापीठ कर्मचारी संघाने २० षटकांत ६ बाद १३४ धावा केल्या. यात रमेश ठोणुक्षे ४४(३९), विश्वनाथ वरूटे ३८(३८), सागर पोवार २२(१५) धावा केल्या. संजीवन इंजनिअरींगकडून सुरज पोवारने २ व ओंकार सरनाईकने १ बळी घेतला. उत्तरादाखल संजीवन इंजनिअरींगने २० षटकांत ७ बाद ११९ धावा केल्या. यात निखिल सावंत ३७(३५), सुरज पोवार २०(७), शुभम पोवार १९(१२) व सौरभ भोसले १२ (९) धावा केल्या. विद्यापीठ कर्मचारी संघाकडून योगेश साळवीने ३, शशिकांत दाभाडेने २, रमेश ठोणुक्षे व सागर पोवार यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

दुसरा सामना महावितरणविरुद्ध शाहू स्पोर्टस् ॲकॅडमी 'ब'मध्ये झाला. यात महावीतरणने १३५ धावांनी विजय मिळविला. महावितरणने २० षटकांत ७ बाद १६६ धावा केल्या. यामध्ये रमेश पाटील ८० (४६), नितीन सावर्डेकर २५, गिरीष भोसले नाबाद १२(९), सचिन माने ११ धावा केल्या. शाहू स्पोर्टस् ॲकॅडमी 'ब'कडून अभिजीत पाटीलने ३, अजिंक्य मगदुमने २ व विराज चव्हाणने १ बळी घेतला. उत्तरादाखल खेळताना शाहू स्पोर्टस् ॲकॅडमी 'ब'ने ११५ षटकांत सर्वबाद फक्त ३१ धावा केल्या. यामध्ये एकाही फलदांजाने दुहेरी धावा केल्या नाहीत. महावितरणकडून अशोक पहाडने ४, मंगेश पोवारने ३, राहुल कोळी व सागर कांबळे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

अधिविभागांनी बनवले 'प्रोफाईल'

नॅक मूल्यांकन तयारीला वेग : गुणात्मक गोष्टींचे सादरीकरणाचे काम सुरू; मार्चमध्ये येणार समिती

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : नॅक मूल्यांकनासाठी शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागांनी आपले प्रोफाईल बनवले आहेत. यामध्ये अधिविभागाचा उद्देश, विभागप्रमुखांचे उद्दिष्ट, अधिविभागातील प्राध्यापकांचे आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रसिद्ध झालेले शोधनिबंध, पेटंट या सर्वांचा समावेश आहे. विद्यापीठाचा नॅकची तयारी अंतिम टप्प्यात असून, विद्यापीठातील गुणात्मक गोष्टींचे सादरीकरण करण्याचे काम सुरू आहे.

शिवाजी विद्यापीठ

बदललेल्या मूल्यांकन पद्धतीनुसार पहिल्यांदाच शिवाजी विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन होत आहे. २०१९ मध्येच या मूल्यांकनाला सुरूवात झाली. नॅकच्या पोर्टलवर विद्यापीठाने आपला सेल्फ स्टडी रिपोर्ट (एस. एस.आर) सादर केला. त्यानुसार विद्यापीठाचे सातशे गुणांचे संख्यात्मक मूल्यांकन झाले आहे. तीनशे गुणांचे गुणात्मक मूल्यांकन नॅक समिती १५ ते १७ मार्च या कालावधीत करणार आहे. यासाठीची तयारी विद्यापीठात युद्धपातळीवर सुरू असून, अधिविभागांनी आपले प्रोफाईल समितीला सादर करायचे आहेत. या प्रोफाईलमध्ये अधिविभागांनी आपले उद्दिष्ट, तेथील प्राध्यापकांचे शोधनिबंध, पेटंट, संशोधन, प्रतिष्ठीत माजी विद्यार्थी यांसह अधिविभागांनी राबवलेले सामाजिक उपक्रम यांचा समावेश आहे. या प्रोफाईलचे दोनवेळा सादरीकरण झाले असून, त्याचा मुद्रित अहवालही बनवण्यात येणार आहे. गुणवत्ता मूल्यमापनामध्ये ३८ निकष आहेत, तर संख्यात्मक मूल्यमापनामध्ये सुमारे ९० निकष आहेत.

"नॅकने विद्यापीठाचे संख्यात्मक मूल्यमापन झाले आहे. गुणात्मक मूल्यमापन होणार आहे. यासाठी अधिविभागांनी आपले प्रोफाईल बनवले असून, यामधून विद्यापीठाचे शैक्षणिक आणि संशोधनात्मक योगदान नॅकसमोर सादर होईल. नॅकची सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून, काम गतीने सुरू आहे.

- प्रा. डॉ. एम. एस. देशमुख,

संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ

गुणात्मक परीक्षणाचे निकष

- अभ्यासक्रम
- अभ्यासक्रमांतर्गत बाबी
- विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे झालेले आकलन
- ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या साईट
- अध्यापन पद्धती.
- आय.टी. फॅसिलिटी.
- विद्यापीठाने राबवलेले सामाजिक उपक्रम
- पर्यावरणपूरक परिसर.

केडीसीए टी-२० क्रिकेट स्पर्धा

शिवाजी विद्यापीठ, महावितरण संघ विजयी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित टी-२० 'क' गट क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ आणि महावितरण संघाने प्रतिस्पर्ध्यांना नमवत आघाडी मिळविली.

राजाराम कॉलेजच्या मैदानावरील पहिल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने २० षटकांत ६ बाद १३४ धावा केल्या. यात रमेश ठोणुक्षे ४४, विश्वनाथ वरूटे ३८ धावा केल्या. संजीवनकडून सुरज पोवारने २ विकेटस् घेतल्या. उत्तरादाखल संजीवनचा संघ ११९ धावांपर्यंत मजल मारू शकला.

दुसऱ्या सामन्यात महावितरणने २० षटकांत ७ बाद १६६ धावा केल्या. यात रमेश पाटीलने ८० तर नितीन सावर्डेकरने २५ धावांची खेळी केली. उत्तरादाखल शाहू स्पोर्टस्चा संघ ११.५ षटकांत ३१ धावांत गुंडाळला. महावितरणकडून अशोक पहाडने ४, संगेश पोवारने ३ विकेटस् घेतल्या.

गल्लोगल्ली दिवटा अन् गीतांचे सादरीकरण

दिवाळीचे स्वागत : सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात पश्चिम भागात लोककला टिकून

» जागर लोककलांचा - भाग २

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : दिवटा म्हणजे गल्लीच्या अस्मितेचा प्रश्न, आपल्या गल्लीत दुसऱ्या गल्लीचा दिवटा येणार नाही, याची दक्षता घेतली जाते. दिवाळीच्या आठ दिवस अगोदर दारोदार दिवटा ओवाळण्याची प्रथा आहे. ती महाराष्ट्रभर पाहावयास मिळत असली तरी सांगली व कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागातील तिची परंपरा वेगळी आहे. दिवटा ओवाळत निरनिराळ्या गीतांचे सादरीकरण करणे, हा त्यातील महत्त्वाचा गाभा.

दिवाळीचे स्वागत करण्यासाठी ही प्रथा सुरू झाली असावी, असे सांगितले जाते. ही प्रथा कालांतराने सर्व जातीत रूढ झाली. गल्लोगल्ली दिवटा घेऊन मुले सायंकाळच्या वेळी दिवट्यांच्या गीतांचे सादरीकरण करतात. गल्लीतील दारोदार जाऊन दिवटा ओवाळतात. त्यासाठी ते वेगळी वेशभूषा किंवा रंगभूषा करत नाहीत. बडबडगीतांत मोडणारी गीते सादर झाल्यानंतर मुलांना दिवट्यासाठी तेल व खोबरे दिले जाते. ही गीते परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत आली आहेत. काही गावांत मुलांकडूनच गीते तयार झाली आहेत. गाव, परिसर, देशपातळीवरील घटना किंवा व्यक्तींचे संदर्भ गीतांत येतात. एका गल्लीतील दिवटा दुसऱ्या गल्लीत घेऊन जायचा नाही व दुसऱ्या गर्दीतील दिवटा आपल्या गल्लीत येऊ द्यायचा नाही, असा संकेत पाळला जातो.

दिवाळीतील पाडव्याचा दिवस हा दिवटा ओवाळणीचा शेवटचा दिवस असतो. वेळूच्या गवतापासून नागाची प्रतिमा याच दिवशी आकार घेते. महिला यादिवशी नागाच्या फडीला ओवाळतात. दिवटा ओवाळण्याची प्रथा आजही काही गावात टिकून असली तरी तिचे प्रमाण हळूहळू कमी होत आहे.

कोल्हापूर : दिवटा ओवाळणी करताना मुले.

दिवटा ओवाळण्याची प्रथा नेमकी कधी सुरू झाली, याबाबत नेमकेपणाने सांगणे कठीण आहे. कालानुरूप या परंपरेत बदल होत गेले. दिवाळीची शोभा वाढवणे व मनोरंजन करणे, हा मुख्य उद्देश आहे. आज ज्येष्ठ नागरिक ही लोककला टिकविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. तिचे हस्तांतरण ते नव्या पिढीकडे करत आहेत. मात्र, सोशल मीडियाच्यात अडकलेली पिढी ही लोककला येईल का, याबाबत साशंकता आहे.

- प्रा. डॉ. नंदकुमार मोरे.